**क्रमांक : १११**

**महाराष्ट्र विधानसभा**

**पत्रक भाग दोन**

**बुधवार, दिनांक २ ऑगस्ट, २०२३/ श्रावण ११, १९४५ (शके)**

**१११.** महाराष्ट्र विधानसभा नियम १०६ (३) अन्वये शुक्रवार, दिनांक ४ ऑगस्ट, २०२३ रोजी सभागृहात चर्चेसाठी घेण्यात येणाऱ्या अशासकीय ठरावांच्या सूचना :-

**(अ) दिनांक २१ जुलै, २०२३ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या तथापि, चर्चा न झालेल्या अशासकीय ठरावांच्या सूचना (क्रमांक १ ते ३) :-**

**(१) श्री.नारायण कुचे, वि.स.स. यांचा ठराव क्र. २६५**

"राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण व रोजगाराअभावी त्यांच्यात निर्माण झालेले वैफल्य विचारात घेता बेरोजगारांच्या समस्या परिणामकारकपणे सोडविण्यासाठी एक सक्षम व स्वतंत्र यंत्रणा स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२) **श्री.किसन कथोरे, वि.स.स. यांचा ठराव क्र. २५५**

"राज्यात वेगवेगळया प्रकल्पांमुळे विस्थापित झालेल्या प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे काम अद्यापही पूर्ण झालेले नसल्याने विस्थापितांचे होत असलेले हाल, त्यामुळे शासनाच्या विचाराधीन प्रकल्पांसाठी जमिनी देण्याच्या कामाला शेतकऱ्यांचा होत असलेला विरोध, त्याबाबत निर्माण केल्या जाणाऱ्या कायदेशीर अडचणी इत्यादी बाबी विचारात घेता प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे रखडलेले काम तात्काळ पूर्ण करण्यासाठी कालबध्द धडक कार्यक्रम राबविण्यात यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(३) **श्री.अमित देशमुख, वि.स.स. यांचा ठराव क्र. १८३**

"राज्यातील नगरपालिका व महानगरपालिकांना शासनाकडून अनुदान मिळत असल्यामुळे त्यांच्या आर्थिक कारभारावर नियंत्रण ठेवण्यासाठी पंचायत राज समितीच्या धर्तीवर विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**(ब) मंगळवार, दिनांक १ ऑगस्ट, २०२३ रोजी बॅलटमध्ये आलेल्या अशासकीय ठरावांच्या सूचना (क्रमांक १ ते ५) :-**

**(१) श्री. संजयमामा शिंदे, वि.स.स. यांचा ठराव क्र. १६९**

"शेतीची नापिकी, अतिवृष्टी, जलप्रकोप, दुबार पेरणी, तिबार पेरणी, ओला व कोरडा दुष्काळ असे असूनही पिक विमा नुकसान भरपाई पासून उंबरठा उत्पन्नाच्या जाचक निकषामुळे शेतकरी वंचित राहत असणे, याला शंभर वर्ष जुनी ब्रिटीशकालीन आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष कारणीभूत असल्याने त्यात बदल करून सुधारित आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष तयार करण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**(२) श्रीमती प्रतिभा धानोरकर, वि.स.स. यांचा ठराव क्र. १४३**

"शेतकऱ्यांना शेती व्यवसायासाठी लागणारी रासायनिक खते, अवजारे, कीटकनाशके यांच्या किमतीमध्ये सतत होणारी वाढ तसेच शेतकऱ्यांना शेती मालाचे न परवडणारे भाव विचारात घेता, शेतकऱ्यांना उत्पादन खर्चावर आधारित असे शेती मालाचे भाव मिळण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

.. २/-

**(३) <u>ॲड पराग अळवणी, वि.स.स. यांचा ठराव क्र. ६९</u>**

"राज्यात मुख्यत: शाळांमध्ये अंमली पदार्थाची वाढत असलेली विक्री व अंमली पदार्थाचा महाविद्यालयातील युवकांमध्ये होत असलेला प्रसार व त्यामुळे विद्यार्थी जीवनावर होणारे विपरीत परिणाम लक्षात घेऊन याबाबत शासनाने शाळा तसेच महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये जागरुकता मोहीम सुरु करून अंमली पदार्थांच्या विक्रीवर आळा बसविण्यासाठी करावयाची कारवाई व उपाययोजना विचारात घेण्यात यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**(४) <u>श्री. सुभाष धोटे, वि.स.स. यांचा ठराव क्र. १३८</u>**

"शासनातर्फे राज्यातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शाळा व महाविद्यालयामार्फत स्कॉलरशिप व शुल्क सवलत दिली जाते त्याच धर्तीवर राज्यातील अल्पभूधारक शेतकरी कुटूंबातील पाल्यांना शाळा व महाविद्यालयामार्फत स्कॉलरशिप व शुल्क सवलत देण्यात यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**(५) <u>श्रीमती मनिषा चौधरी, वि.स.स. यांचा ठराव क्र. २३१</u>**

"महाराष्ट्र राज्याला ७२० कि.मी.चा समुद्रकिनारा लाभलेला असून तो मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या जिल्हयांना स्पर्शून जातो, सदर जिल्हयातील जनतेचे मासेमारी हे पारंपारीक प्रमुख उत्पन्नाचे व जीवीताचे साधन असताना राज्यशासनाचे मत्स्य विद्यापीठाचे मुख्यालय नागपूर येथे असणे या जिल्हयांना सोईचे ठरत नसल्यामुळे मत्स्य विद्यापीठाचे मुख्यालय कोकणात असावे अशी शिफारस मा.खासदार डॉ. भालचंद्र मुणगेकर यांच्या अध्यक्षतेखालील समितीने केलेली आहे. त्या शिफारसीची अंमलबजावणी तातडीने करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : २ ऑगस्ट, २०२३

**जितेंद्र भोळे**
सचिव- १ (कार्यभार),
महाराष्ट्र विधानसभा

**<u>याची प्रत :</u>**

१. महाराष्ट्र विधानसभेचे सर्व सन्माननीय सदस्य.
२. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व कक्ष.
३. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये.
४. संगणक कक्ष (website)